

महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू

पान : भारत सागरी सप्ताह- २०२५

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

आयसीयूमधून श्रेयस अय्यर बाहेर

पान : क्रीडा



मुंबई ● मंगळवार, २८ ऑक्टोबर २०२५ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक १९ ● पाने १० ● ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in







## वेचक

### ‘रन फॉर युनिटी’मध्ये सहभागी व्हा : पंतप्रधान




**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी देशभरातील नागरिकांना सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या 'रन फॉर युनिटी'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम राष्ट्रीय एकता दिवसाचे प्रतीक आहे आणि सरदार पटेल यांनी भारतासाठी कल्पना केलेल्या एकतेच्या चिरस्थायी भावनेचा उत्सव साजरा करतो.

### उत्तराखंडमध्ये डिसेंबरपासून ग्रीन टॅक्स

**देहराहून :** उत्तराखंड राज्याला देवाचा आशीर्वाद आहे, त्यामुळेच हे राज्य पर्यावरणीय दृष्ट्या समृद्ध आहे. पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रण लक्षात घेऊन उत्तराखंड सरकारने बाहेरील राज्यांतून येणाऱ्या वाहनांवर ग्रीन टॅक्स लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा नियम डिसेंबर २०२५ पासून लागू होणार आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हा निर्णय राज्यात स्वच्छता आणि पर्यावरण सुरक्षा वाढवण्याच्या उद्देशाने घेतला गेला आहे. राज्य सरकारचे मत आहे की झपाट्याने वाढणारे वाहन प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कडक उपाययोजना आवश्यक आहेत.

### सेल्फी घेत असताना होडी उलटली

**चंदौली :** उत्तर प्रदेशातील चंदौली येथे सोमवारी छठ पूजेदरम्यान एक मोठी दुर्घटना घडली. येथे लोक सेल्फी घेत असतानाच एक होडी उलटली. या होडीवरील अनेक जण नदी पात्रात बुडाले. यावेळी घाटावर असलेल्या काही स्थानिक लोकांनी तत्काळ नदीपात्रात उड्या घेत चार जणांना जीव वाचवल्याचे समजते. इतरांचा शोध सुरू आहे. पोलीसही गोताखोरांसह घटनास्थळी दाखल झाले आहेत. ही घटना बबुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोदोचक गावात घडली.



### सीमेवर कधीही काहीही घडू शकते : राजनाथ सिंह

**नवी दिल्ली :** भारताने नेहमी युद्धासारख्या परिस्थितीसाठी तयार राहिले पाहिजे. कारण, सीमेवर कधीही काहीही घडू शकते, असा इशारा संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिला. मे महिन्यातील ‘ऑपरेशन सिंदूर’चा उल्लेख करत देशाच्या लष्करी सज्जतेचे आणि स्वदेशी क्षमतेचे महत्त्व अधोरेखित केले. पाकिस्तानशी झालेला चार दिवसांचा संघर्ष हे सिद्ध करतो की सीमेवर परिस्थिती क्षणात बदलू शकते, असे ते म्हणाले.

**सोन्याचा भाव**

२४ कॅरेट प्रति तोळा १२३२८० रुपये

२२ कॅरेट प्रति तोळा ११३००० रुपये

**चांदीचा भाव**

प्रति किलो १५५००० रुपये

अखेर इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात अखेरच्या सत्रात मजबुतीसह वाढ प्रस्थापित झाली आहे. शेअर बाजारात आज मोठी वाढ गुंतवणूकदारांनी दाखवलेल्या सकारात्मकतेमुळे झाल्याचे स्पष्ट झाले. जागतिक अर्थव्यवस्थेतील संतुलित सकारात्मकता, आशियाई बाजारातील सकारात्मकता यांचा एकत्रित परिणाम म्हणून शेअर बाजार आज दिवसभरात 'बुलिश' राहिल्याने वाढीसह बंद झाला.

# नवा सागरी इतिहास घडवण्यासाठी भारत सज्ज : अमित शहा

**भारत सागरी सप्ताह २०२५ चे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते शानदार उद्घाटन**



◆ अल्पेश म्हात्रे

**मुंबई :** मुंबई हे भारताच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाचे स्थान असून या मुंबईमध्ये आज भारत नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी सज्ज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले. मुंबई ही देशाच्या सागरी शक्तीचा केंद्र बिंदू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नेस्को, गोरेगाव, मुंबई येथे आयोजित इंडिया मेरीटाईम वीक २०२५ या आंतरराष्ट्रीय सागरी परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी केंद्रीय गृह व सहकार मंत्री शहा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन शरण मांझी, तसेच केंद्रीय राज्यमंत्री शंतनू ठाकूर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे आणि केंद्रीय सचिव विजय कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

आज जगभरातील सागरी तज्ज्ञ, उद्योगपती आणि प्रतिनिधी भारतात एकत्र आले असल्याचे सांगून, केंद्रीय गृह व सहकार मंत्री शहा म्हणाले की, ‘गेटवे ऑफ इंडिया’ आता ‘गेटवे ऑफ द वर्ल्ड’ बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारताचा ११ हजार किलोमीटरचा किनारा आता जागतिक विकास केंद्र होत आहे. सागरी क्षेत्र देशाच्या जीडीपीत ६० टक्क्यांहून अधिक योगदान देतो. पाच हजार वर्षांपूर्वीपासून भारत सागरी व्यापारात अग्रस्थानी होता. आज इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भारत पुन्हा आपली सागरी ताकद सिद्ध करत आहे. सागर, सागरमाला, गतिशक्ती आणि समुद्रयान यांसारख्या प्रकल्पांमुळे सागरी पायाभूत सुविधांना नवे बळ मिळाले आहे. भारत जहाजबांधणीत जगात पाचव्या क्रमांकावर असून नवीन बंदरांची उभारणी वेगाने सुरू असल्याचे ते म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री शहा म्हणाले की, देशातील ९० टक्के व्यापार सागरी मार्गाने होतो. २०४७ पर्यंत भारत जागतिक सागरी नेतृत्व प्राप्त करेल, हे आमचे ध्येय आहे. वाढवण बंदर लवकरच जगातील टॉप १० बंदरांमध्ये गणले जाईल. ग्रेट निकोबार व कोचिन बंदरात नव्या गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू आहे. मच्छीमारांच्या सुरक्षेसाठीही सरकारने ठोस उपाययोजना केल्या आहेत. जागतिक गुंतवणूकदारांनी भारताच्या सागरी क्षेत्रात सहभागी होऊन आपल्या आणि भारताच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

(अन्य वृत्तात; पान ३)



# निवडणूक याद्यांची १२ राज्यांत सखोल छाननी

**निवडणूक आयोगाकडून दुसरा टप्पा जाहीर**

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**


केंद्रीय निवडणूक आयोगाने देशातील १२ राज्यांमध्ये विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू करण्याची सोमवारी घोषणा केली. ज्या राज्यांमध्ये एसआयआरची प्रक्रिया सुरू होणार आहे, तेथे आज मध्यरात्रीपासून मतदार याद्या गोठवल्या जातील. तसेच, इतर राज्यांमध्ये स्थलांतरित झालेले मतदार ऑनलाईन अर्जाद्वारे आपली नावे नोंदवू शकतील, असे त्यांनी सांगितले.

याबाबत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, बिहारमध्ये एसआयआरचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला असून, आता दुसऱ्या टप्प्यात अंदमान-निकोबार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार आहे.

या राज्यांमध्ये सुमारे ५१ कोटी मतदार असून, ५ लाख ३३ हजारांहून अधिक मतदान केंद्रे आणि बीएलओ (ब्लॉक लेव्हल ऑफिसर्स) तैनात केले जातील. एसआयआरचे उद्दिष्ट मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करणे, पात्र मतदारांना समाविष्ट करणे आणि अयोग्य नावे वगळणे हे आहे. प्रत्येक घरात बीएलओ तीन वेळा भेट देऊन माहिती गोळा करतील, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, आयोगाच्या मते, एसआयआरची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष असेल. यात नवीन मतदारांचा समावेश करून लोकशाही प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्याचा उद्देश आहे. देशातील आसाम, तामिळनाडू, पुद्दुचेरी, केरळ आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांमध्ये २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने, या राज्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. मात्र, ज्या ठिकाणी सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत, तेथे ही प्रक्रिया काही काळासाठी थांबवण्यात येईल. भारतीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत अलीकडेच बैठक घेऊन या मोहिमेची तयारी पूर्ण केली आहे.

## देशात प्रथमच ‘घरगुती उत्पन्न सर्वेक्षण’ होणार



**फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवातीची शक्यता**

**आर्थिक असमानता व गरिबी पातळी शोधणे उद्दिष्ट**

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

देश आपले पहिले उत्पन्न सर्वेक्षण करणार आहे. पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षण (एनएचआयएस) सुरू करण्याची सरकारची योजना आहे, असे सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचे सचिव सौरभ गर्ग यांनी एका इंग्रजी वर्तमानपत्राला मुलाखतीत सांगितले.

भारतात पहिल्यांदाच, एक सर्वेक्षण सुरू आहे, ज्यामध्ये प्रत्येक घराच्या उत्पन्नाचा संपूर्ण डेटा गोळा केला जाईल. या सर्वेक्षणातून देशाच्या वेगवेगळ्या भागात लोक किती कमावतात, त्यांचे उत्पन्नाचे स्रोत आणि त्यांची आर्थिक परिस्थिती उघड होईल. या सर्वेक्षणाचा उद्देश देशातील आर्थिक असमानता आणि गरिबीची व्याप्ती तसेच कोणत्या क्षेत्रांकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे हे समजून घेण्यास सरकारला मदत करणे आहे. गर्ग यांच्या मते, हे आतापर्यंतचे सर्वात गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मक सर्वेक्षण आहे.

पहिल्यांदाच, देशात लोकांच्या उत्पन्नाचे इतके व्यापक सर्वेक्षण केले जात आहे. सध्या, सरकारकडे लोक किती खर्च करतात आणि रोजगाराचा डेटा आहे; परंतु त्यांच्याकडे संपूर्ण उत्पन्नाचा डेटा नाही.

## सरन्यायाधीश पदासाठी न्या. सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस

◆ **नवी दिल्ली(वृत्तसंस्था):**

भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी केंद्र सरकारकडे न्यायमूर्ती सूर्यकांत यांना पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्त करण्याची शिफारस सोमवारी केली. जर केंद्र सरकारने ही शिफारस मान्य केली, तर २४ नोव्हेंबर रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत देशाचे ५३ वे सरन्यायाधीश बनतील.

सध्याचे सरन्यायाधीश गवई २३ नोव्हेंबर रोजी पदमुक्त होणार आहेत. विद्यमान सरन्यायाधीश गवई नंतर,



न्यायमूर्ती सूर्यकांत सुप्रीम कोर्टमधील दुसरे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. नियुक्तीनंतर न्यायमूर्ती सूर्यकांत हे ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत सुमारे १५ महिने या पदावर राहतील.

**२४ नोव्हेंबर २०२५ रोजी पदभार स्वीकारणार : १४ महिन्यांचा कार्यकाळ मिळणार**

हरियाणाच्या हिसारमध्ये जन्मलेले न्यायमूर्ती सूर्यकांत सध्या सुप्रीम कोर्टमधील दुसरे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांनी १९८१ साली गव्हर्नमेंट पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज, हिसार येथून पदवी प्राप्त केली आणि १९८४ साली रोहतक येथील महर्षि दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी पूर्ण केली. त्याच वर्षी त्यांनी हिसार जिल्हा न्यायालयात प्रॅक्टिस सुरू केली.

एक वर्ष येथे काम केल्यानंतर ते पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करण्यासाठी गेले. २००४ साली त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. न्यायमूर्ती सूर्यकांत यांना २०१८ साली हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त केले गेले आणि त्यानंतर २४ मे २०१९ रोजी त्यांना सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त केले गेले.

## ‘मोंथा’ चक्रीवादळाचा धोका आजपासून वाढण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

‘मोंथा’ चक्रीवादळ आगामी मंगळवारी २८ ऑक्टोबरपर्यंत तीव्र वादळामध्ये रूपांतरित होण्याची शक्यता आहे. या वादळामुळे आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवरील मछलीपट्टनम आणि कलिंगपट्टनम या भागांदरम्यान धोका निर्माण होऊ शकतो.

हवामान खात्याने सांगितले की, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र आता चक्रीवादळाच्या रूपात विकसित झाले आहे.

या वादळामुळे ओडिशा आणि आंध्र प्रदेशात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून, सुमारे १५ जिल्ह्यांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

## मराठा–कुणबी आरक्षणासंबंधी जीआरवर सुनावणीला न्यायालयाचा नकार

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

मराठा-कुणबी आरक्षणासंदर्भात सरकारने काढलेल्या जीआरवर सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला लवकर सुनावणी घेण्याचे निर्देश देण्यास नकार दिला. मात्र, ओबीसी वेल्फेअर असोसिएशनला अंशतः दिलासा देत स्वतंत्र अर्ज दाखल करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिली.

ओबीसी वेल्फेअर असोसिएशनचे मंगेश ससाणे यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेत संघटनेने असा दावा केला होता की, राज्य सरकारने मराठा समाजासाठी




काढलेल्या कुणबी प्रमाणपत्र जीआरनंतर मोठ्या प्रमाणात मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्रे दिली जात आहेत. त्यामुळे ओबीसींच्या आरक्षणावर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी बॉम्बे उच्च न्यायालयातील सुनावणी तातडीने घेण्याची मागणी केली होती.

**भाजपच्या नव्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे भूमिपूजन**

## पक्ष कार्यालय कार्यकर्त्यांसाठी मंदिरासमान, सच्चे कार्यकर्ते घडवेल!

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी कार्यालय हे मंदिरासमान असते. जनसंघाच्या स्थापनेपासूनच कार्यालयातून संघटना उभारणीचे काम, पक्षाच्या सिद्धांतांचे संवर्धन, कार्यकर्ता प्रशिक्षण, जनहितासाठी संघर्ष केला जातो. नवीन प्रदेश कार्यालय पुढच्या अनेक पिढ्या सच्चे कार्यकर्ते घडवेल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी व्यक्त केला. शहा यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टीच्या नवीन प्रदेश कार्यालयाचे भूमिपूजन सोमवारी संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.



शहा म्हणाले की, अन्य सर्व पक्षांसाठी पक्ष कार्यालय ही केवळ वास्तू असते. मात्र भाजप कार्यकर्त्यांसाठी कार्यालय हे मंदिराप्रमाणे असते. भाजप हा एकमेव पक्ष आहे जिथे बूथ अध्यक्ष पार्टीचा अध्यक्ष बनतो. पंतप्रधान, मुख्यमंत्री हे देखील कार्यकर्त्यांमधूनच बनतात. भाजपमध्ये घराणेशाहीला थारा नाही असे म्हणत त्यांनी काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांवर टीका केली. लोकशाही मूल्यांवर आधारित भाजपचा कारभार आहे. सेवा, त्याग, समर्पण आणि देशभक्तीच्या बळावर जो कार्य करतो तो सामान्य कार्यकर्ताही उंचीवर जाऊ शकतो. नरेंद्र मोदी हे त्याचे उत्कृष्ट उहादरण आहे असेही शहा यांनी नमूद केले. जो पक्ष लोकशाही मूल्यांवर चालतो तोच पक्ष लोकशाहीचे खऱ्या अर्थाने रक्षण करू शकतो, असा टोला घराणेशाहीवर चालणाऱ्या पक्षांना लगावला. सर्व शासकीय जिल्ह्यांतील भाजप मुख्यालयांची कामे ही डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होतील. जवळपास ६६० संघटनात्मक जिल्ह्यांपैकी ३७५ जिल्ह्यांत कार्यालये आहेत आणि ९० ठिकाणी काम सुरू आहे असेही ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आज सर्वच आघाड्यांवर अव्वल बनत आहे. गरीब कल्याण, मोफत धान्यवाटप, मोफत वैद्यकीय सुविधांमुळे गरिबांचे जीवन सुकर केले आहे. अर्थव्यवस्था ११ व्या स्थानावरून ४ थ्या क्रमांकाची बनली आहे. देश बलशाली, आत्मनिर्भर आणि सुरक्षित बनला आहे. दहशतवादी हल्ले करणाऱ्यांना जबर धडा शिकवला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## अमेरिकेत कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे विमान उड्डाणांवर परिणाम

◆ **वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :**

अमेरिकेत सुरू असलेल्या शटडाऊनचा व्यापक परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागला आहे. दक्षिण कॅलिफोर्नियातील हवाई वाहतूक केंद्रात कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे लॉस एंजेलिस आंतरराष्ट्रीय विमानतळावर जाणाऱ्या उड्डाणांना काही काळासाठी थांबवावे लागले. या कारणामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ आणि घबराट पसरली. फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन (एफएए)ने याबाबत माहिती देताना सांगितले की, शिकागो, वॉशिंग्टन आणि नेवार्क (न्यू जर्सी) येथील विमानसेवाही कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे उशिराने सुरू आहेत.

अमेरिकेचे परिवहन मंत्री सीन डफी यांनी अंदाज वर्तवला आहे की, पुढील काही दिवसांत आणखी अनेक उड्डाणे उशिरा होतील किंवा रद्द करावी लागतील, कारण देशातील हवाई वाहतूक नियंत्रकांना संघीय सरकारच्या ‘शटडाऊन’ काळात वेतनाशिवाय काम करावे लागत आहे. सीन डफी यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, “अनेक नियंत्रक आजारी असल्याचे सांगत आहेत, कारण वेतन न मिळाल्यामुळे आर्थिक ताण वाढला आहे आणि आधीच अवघड असलेले त्यांचे काम आणखी तणावपूर्ण झाले आहे.” दरम्यान, डेमोक्रॅटिक पक्षाने म्हटले आहे की, जोपर्यंत राष्ट्राध्यक्ष ट्रम्प स्वतः हस्तक्षेप करत नाहीत,




तोपर्यंत या समस्येचे निराकरण शक्य नाही. सध्या अमेरिकेतील परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे.

शटडाऊनमुळे सामान्य नागरिकांचे जीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. अमेरिकेतील मेरीलँड, कॅलिफोर्निया, ॲरिझोना आणि टेक्सस यांसारख्या शहरांमध्ये हजारो लोक मोफत अन्नासाठी फूड बँकसमोर तासनतास रांगेत उभे आहेत. शटडाऊनमुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार थांबले आहेत, त्यामुळे त्यांच्या हातात ना पैसा उरला आहे ना निश्चित नोकरी. आता स्थिती इतकी बिकट झाली आहे की, फूड बँकांमध्येही अन्नाची टंचाई निर्माण झाली आहे. अमेरिकेत शटडाऊन १ ऑक्टोबरपासून सुरू झाला, जेव्हा डेमोक्रॅटिक पक्षाच्या सदस्यांनी अल्पकालीन आर्थिक सहाय्याच्या प्रस्तावाला नकार दिला आणि मागणी केली की त्या विधेयकात ‘अफोर्डेबल केअर ॲक्ट’अंतर्गत आरोग्य विम्यासाठी संघीय अनुदानाचा विस्तार समाविष्ट केला जावा. सध्या शटडाऊनचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम दिसत आहे आणि सामान्य जनता त्याचा सर्वाधिक फटका सहन करत आहे.